# जागृती

येऊन मनुष्यजन्मास मी काय मिळविले काय गमविले
उत्तर या प्रश्नाचे, आधी न मी कधी शोधिले
सरत्या काली, त्या आठवणीने मज बहुत सताविले
आयुष्याच्या जमाखर्चाचे गणित मी समोर मांडिले
काम, क्रोध, मोह, माया, मत्सराच्या जाळ्यात होतो मी अडकलो
सुटण्यासाठी त्यातून, कधी न मी कष्टलो
पश्चात्ताप होऊन मी स्वतःवरच चिडलो
केल्या चुका सुधारण्यास्तव मी सरसावलो
काम, क्रोधाने होते वेढले, मोहाने मोहून मज टाकले
गर्वाने गर्वित होऊन, मत्सरासहि होते जोपासले
असे दोष जवळ बाळगून, आजवर मी काय मिळविले
मनुष्यजन्मास येऊन, मी स्वतःस का फसविले
ईश्वरकृपा होऊन आज मला जागृत केले
सद्‌बुद्धीची आठवण देऊन त्याने मला समजाविले
कळले मजला, सरले आयुष्य मी कसे फुकट दवडले
उपरती होऊन उरले आयुष्य मी सत्कारणी वाहिले

■

**– पद्‌माकर चित्रे**

**('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)**